I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 222-226 | OPEN ACCESS | e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal | Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोरोनाचा ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा. आशिष रामदास देरकर

विषय संप्रेषण (सहकार)
महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, गडचांदूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

कोरोनाने संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला डबघाईस आणले. भारतातही कोरोनाचा फार प्रसार झाला. प्रचंड प्रमाणात वाढता संसर्ग व स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही देशात आरोग्यविषयक सोयी–सुविधांच्या अभावामुळे देशात मृत्यूसंख्येत वाढ होऊ लागली. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे २४ मार्च २०२० रोजी केंद्र व राज्य सरकारने संचारबंदीची घोषणा केली. अनियोजित संचारबंदीमुळे अनेक लोकांना रोजगाराच्या ठिकाणाहून स्थलांतरीत होऊन स्वगावी परतावे लागले. त्यात लाखो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला. त्याचा विपरित परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. बेरोजगारीचा दर वाढला. कोरोना विषाणूमुळे अर्थव्यवस्थेतील दुग्ध व्यवसाय, हॉटेल्स, रेस्टॅरंट आणि बार व्यवसाय, शेती व्यवसाय, पर्यटन क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, रिक्षाचालक, वाहतूक व्यवसाय व बांधकामासारख्या मोठ्या व्यवसायावर कसा विपरित परिणाम झाला व त्याची अर्थव्यवस्थेला कशी झळ पोहचली याचे विश्लेषण या शोध निबंधात करण्यात आले आहे.

सकारात्मक दृष्टीकोन बाळगून परिस्थितीवर मात करण्यासाठी केवळ शासनच नाही तर प्रत्येक नागरिकांनी सुध्दा प्रयत्न करण्याची गरज आहे. आलेल्या संकटांवर मात करून नवे क्षितीज गाठण्यासाठी प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्रात नवनिर्माण करण्याची व अर्थव्यवस्थेला बळ देण्याची आवश्यकता आहे. तरच आपण प्रगतीची उंच शिखरे गाठू शकणार.

**बीजशब्द :** कोरोनाचा प्रसार, ग्रामिण व शहरी बेरोजगारी, भारतीय राज्यकर्ते व नागरिकांची जबाबदारी.

**प्रस्तावना :**

कोरोनाने संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला डबघाईस आणले. भारतातही कोरोनाचा फार प्रसार झाला. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे २४ मार्च २०२० रोजी केंद्र व राज्य सरकारने संचारबंदीची घोषणा केली. अनियोजित संचारबंदीमुळे अनेक लोकांना रोजगाराच्या ठिकाणाहून स्थलांतरीत होऊन स्वगावी परतावे लागले. त्यात लाखो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला. त्याचा विपरित परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. बेरोजगारीचा दर वाढला आणि एकंदरीत कोरोनामुळे निर्माण झालेल्या भिषण परिस्थितीमुळे भारतीय अर्थव्यवस्था डगमगली. अर्थव्यवस्थेला या संकटातून बाहेर काढण्याचे धोरणात्मक आव्हान आज राज्य व देशातील राज्यकर्त्यांपुढे उभे ठाकले आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील अनेक क्षेत्रे प्रभावित झाली. देशातील रोजगाराशी संबंधित विविध क्षेत्रांवर कोरोनाचा काय परिणाम झाला याचे विवेचन या शोधनिबंधात केले आहे.

भारत हा कृषीप्रधान देश असून जवळपास ६० टक्के भारतीय कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. कृषीसोबतच औद्योगिक व सेवा क्षेत्र देखील तेवढेच महत्वाचे आहे. अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर कोरोना विषाणूचा प्रतिकुल परिणाम झाल्याने अनेक नागरिकांना बेरोजगार व्हावे लागले. देशात यापूर्वी सुध्दा अनेक साथीचे रोग आले. त्यावर मात करण्यात शासनाला यश पण मिळाले. मात्र कोरोना विषाणूवर अजूनही पाहिजे त्याप्रमाणात यश मिळवता आले नाही. एकाचवेळी संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला कोलमडून टाकणारा कोरोनासारखा विषाणू कधी जगात अवतरेल याची कल्पनाही आजपर्यंत कोणी केली नसेल. या परिस्थितीतून सावरण्यासाठी संपूर्ण जग कसोशीने प्रयत्न करीत आहे. भारतही त्यास अपवाद नाही. अमेरिका–युरोप यासारख्या पाश्चात्य देशांप्रमाणे भारतात कोरोनाचा कहर झाला नसला तरी विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेला या कोरोना विषाणूने फार संकटात ओढले आहे. हे विसरता कामा नये. आजघडीला काही प्रमाणात हे संकट ओसरल्यानंतर केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगात प्रचंड प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली आहे. मात्र तुर्तास आपण भारतातील बेरोजगारीकडे लक्ष केंद्रीत करणार आहो.

२०१८–१९ या वर्षात करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार भारतातील एकूण कामगारांपैकी ९३ टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करतात. कोरोना संकटाच्या काळात टिकूण राहण्याइतपतही त्यांच्याकडे पैसा आणि इतर संपत्ती असेल, असे वाटत नाही. रोजंदारीवर काम करणारे मजूर, फुटपाथवर हातठेले घेऊन किरकोळ

साहित्याची विक्री करणारे लघु व्यावसायिक, कंत्राटी कामगार आणि इतर किरकोळ व्यवसाय करून स्वत:चा उदरनिर्वाह करणारे कामगार व मजूर यांची या संकटकाळात काय हालत झाली असेल याची कल्पनाही आपण करू शकत नाही. टाळेबंदीमुळे अन्न आणि निवारा यांची उणिव निर्माण झाल्याने देशातील लाखो स्थलांतरित मजुरांनी आपापल्या गावाकडची वाट धरली. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोरही रोजगाराचा प्रश्न उभा ठाकला. आहे ती नोकरी हातातून जाण्याचे संकट त्यांच्यावर अजूनही घोंघावत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीवर बारकाईने लक्ष ठेवणाऱ्या 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या संस्थेने ५ एप्रिल २०२० रोजी संपलेल्या आठवड्यापर्यंत भारतातील बेरोजगारीचा दर तब्बल २३.४ टक्क्यांनी वाढल्याचा अंदाज व्यक्त केला होता. फेब्रुवारीत ७.८ टक्के असलेला हा दर मार्चमध्ये ८.७ टक्क्यांपर्यंत वाढला होता. यावरून कोरोनासंकटामुळे कमी कालावधीत बेरोजगारी कित्येक पटींनी वाढली, हे लक्षात येते. मात्र त्याचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ताण येऊन ही ग्रामिण अर्थव्यवस्था कोसळण्याची भीती निर्माण होईल.

स्वातंत्र्यांच्या ७५ वर्षानंतरही आपल्या देशात पुरेशी आरोग्यविषयक सोयीसुविधांची उपलब्धता नसल्याचे चित्र कोरोना काळात आपल्याला अनुभवायला मिळाले. स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनी सुध्दा अशाप्रकारच्या साथीच्या रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी आपल्या देशातील यंत्रणा उभारता आली नाही. ही फार मोठी शोकांतिका आहे. वेळेवर आरोग्य व्यवस्था उभारण्यात सरकारची कोंडी झाली. प्रत्येक खेड्यापाड्यात आरोग्य विषयक सुविधांचा अभाव दिसून आल्याने लोकांमध्ये कोरोनाची दहशत निर्माण झाली. अनेक मजूर या भितीने मिळेल तो आधार घेऊन स्वगावी परतण्यासाठी प्रयत्न करताना दिसला. या बाबीचा प्रचंड परिणाम रोजगारावर झाला असून देशात बेरोजगारीच्या दरात मोठी वाढ झाली आहे.

कोरोना विषाणूमुळे अर्थव्यवस्थेतील दुग्ध व्यवसाय, हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि बार व्यवसाय, शेती व्यवसाय, पर्यटन क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, रिक्षाचालक, वाहतूक व्यवसाय व बांधकामासारख्या मोठ्या व्यवसायावर कसा विपरित परिणाम झाला व त्याची अर्थव्यवस्थेला कशी झळ पोहचली याचे विश्लेषण या शोध निबंधात करण्यात आले आहे.

**कोरोना विषाणूमुळे प्रभावित झालेली क्षेत्रे**

**दुग्ध व्यवसाय**

कोरोनामुळे देशात लॉकडाऊन लागले. त्यामुळे शहर व गावे ओस पडल्याने अत्यावश्यक दूध व्यवसायावर याचा फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. दुध नाशवंत वस्तू आहे. वैयक्तिक विक्रीसोबतच अनेक ठिकाणी दुध संकलीत करून वितरण केल्या जाते. कोरोनामुळे शहरातून दुधाची मागणी अत्यंत कमी झाल्याने दररोज संकलित दुधाचे करायचे काय? असा प्रश्न दूध उत्पादकांसमोर निर्माण झाला होता. दुध व्यावसायिकांना मिळेल त्या किंमतीला दुध विकावे लागले. दररोज दूध विकणाऱ्या संस्था उत्पादकांचे दूध कोणही घेण्यास तयार नव्हते. कृषी व्यवसायाशी पुरक असलेला दुग्ध व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेतील कणा आहे. या व्यवसायामुळे ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात रोजगार निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागातील दुधाचे संकलन करून ते शहरी भागात आणण्यासाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून वितरण करण्यात येते. गाव स्तरावर प्राथमिक सहकारी दूध संस्था, तालुका व जिल्हा स्तरावर दूध संघ व त्यांच्या मार्फत शासनाकडे दूध पुरवठा अशी ही साखळी आहे. शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून निश्चित उपयोगी ठरला आहे. पण अस्मानी आणि सुलतानी संकटांचा मोठा फटका हा शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला बसतो. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्था खिळखिळी होते. याचा प्रत्यय संचारबंदीच्या काळात दुध उत्पादकांना आला.

कोरोनाचा प्रादुर्भाव आणि वाढता प्रसार रोखण्यासाठी देशात लॉकडाऊन करण्यात आले. दुधाचा पुरवठा अत्यावश्यक सेवेत येतो म्हणून दूध विक्रीचा व्यवसाय काही प्रमाणात सुरू होता. ज्या शेकतकऱ्यांचे दूध जिल्हा दूध डेअरी संघाकडे जाते त्यांना लॉकडाऊनमध्ये थोडाफार आधार मिळाला. मात्र जे शेतकरी स्वत: दूध विक्रीचे काम करतात त्यांच्यासाठी दूध विक्री ही मोठी समस्या होऊन बसली होती. कारण शेकडो गावांमध्ये सीमाबंदी करण्यात आली होती. ज्या गावाच्या सीमा शहरालगत आहेत, त्यांच्यासाठी गावातून बाहेर पडण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे अशा सर्व शेतकऱ्यांकडे रोजच्या दुधाचा साठा मोठ्याप्रमाणात शिल्लक राहत होता. दूध विक्रीच्या येणाऱ्या पैशातून जनावरांचा चारा, औषधांचा खर्च, गोठ्याच्या डागडुजीचा खर्च केला जातो. रोज दूध विक्रीसाठी जात असल्यामुळे पेट्रोलचा खर्च हे सर्व वजा केल्यास राहिलेली रक्कम हे दुध उत्पादकाचे उत्पन्न असते.

मात्र संचारबंदीमुळे अनेक दुध उत्पादकांना रोजगार हातात असूनही बेरोजगारीची झळ पोहचली.

**हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि बार व्यवसाय**

दिल्ली, मुंबई, कलकत्ता, पूणे, नागपूरसह संपूर्ण देशातील शहरी, निमशहरी व ग्रामिण भागात संचारबंदी लागू केली होती. शहरी व ग्रामिण हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि बार बंद ठेवण्यात आले. या निर्णयामुळे असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कोट्यवधी लोकांना एकाचवेळी बेरोजगार व्हावे लागले. यात हॉटेल, रेस्टॉरंट आणि बार व्यावसायिकांचे फार मोठे नुकसान झाले. सोबतच त्यावर अवलंबून असणाऱ्या कामगारांची अवस्था फार बिकट होती. हाताला काम नसल्याने जीवन–मरणाचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला होता. विशेष म्हणजे पर्यायी रोजगारही उपलब्ध नसल्याने बेरोजगारीचे मुळ खोलवर रूतल्या गेले.

लॉकडाऊनमुळे पर्यटक किंवा प्रवासी वाहतूक बंद असल्याने संसर्ग टाळण्यासाठी शासनाने सर्वत्र हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि बार बंद ठेवण्याचे निर्देश दिले होते. परराज्यातील मजुरांना सर्वात जास्त ही झळ सोसावी लागली. रोजगार गेल्याने परराज्यातील मजूर स्थलांतरित झाले. आजही ह्या मजुरांच्या हाताला काम नसल्याने कुटूंबाचा गाडा हाकायचा कसा? हा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर आहे.

**शेती व्यवसाय**

जगभरात थैमान घातलेल्या कोरोना व्हायरसमुळे शेती उद्योगही प्रभावित झाले. भारतातून निर्यात होणाऱ्या फळभाज्या आणि फळे गोदामामध्ये पडून होते. यामुळे व्यापाऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहिले. अनेक ठिकाणच्या स्थानिक बाजारपेठा बंद पडल्या. कोरोना संसर्ग आजार असल्याने शासनाने गर्दी न करण्याचे आदेश दिले. त्यामुळे शहरांमधील बाजारपेठा आणि आठवडी बाजारपेठा या अनेक दिवस बंद होत्या.

देशासह राज्यातील अनेक जिल्ह्यातील बाजारपेठांवर कोरोनाचा विपरित परिणाम झाला. राज्यातील निर्यात होणाऱ्या फळ भाज्या आणि भाजीपाल्यावर कोरोनाचा प्रभाव जाणवला. देशातून एकूण निर्यातीपैकी ६५ टक्के फळे आणि ५५ टक्के भाजीपाला निर्यात करणाऱ्या महाराष्ट्रावर अवकाळी पाऊस, गारपिटीनंतर कोरोनामुळे आर्थिक संकट उभे झाले. २०१९–२० मध्ये २ कोटी ३० लाख ८४ हजार ६९० मेट्रिक टन भाजीपाला, फळे, फुलांची निर्यात झाली होती. यातून भारताला १ लाख ३० हजार ३८७ कोटी परकीय चलन मिळाले होते. यात सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा होता. मात्र २०२०–२१ मध्ये कोरोनामुळे निर्यात निम्म्यापेक्षा कमी झाली.

द्राक्षांच्या निर्यातीवरदेखील विपरित परिणाम झाला. कोरोनाचा पोल्ट्री व्यवसायावरही परिणाम झाला. भाजीपाला निर्यातीवरही मोठा परिणाम झाला आहे. फळे, भाजीपाला, मटन, चिकन हे पदार्थ नाशवंत असल्याने ते अधिक काळ साठवू शकत नाहीत. त्याचा परिणाम थेट शेतकऱ्यांवर झाला. आंबा निर्यातीवरही परिणाम झाला आहे. कोरोनामुळे आखाती देशांनी हापूस आंब्याची मागणी थांबवली. यामुळे आंबा विक्रेत्यांची सुध्दा चिंता वाढली होती. या व्यवसायातही अनेकांना बेरोजगार व्हावे लागले.

**पर्यटन व्यवसाय**

कोरोना व्हायरसच्या भीतीमुळे देशातील आणि राज्यातील पर्यटन व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. राज्यात लॉकडाऊन लागताच विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रात येणाऱ्या पर्यटकांनी झटपट त्यांचे बुकिंग रद्द केले. जवळपास ७० टक्के परदेशी पर्यटकांनी विदर्भातील चंद्रपूर येथील ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे बुकिंग रद्द केल्यामुळे मोठा फटका बसला आहे. तर औरंगाबादची अजिंठा लेणी ओस पडलेली दिसून आली. पर्यटन व्यवसाय देशात फार मोठे रोजगार देणारे क्षेत्र असल्याने लॉकडाऊनमुळे लाखो लोकांना बेरोजगार व्हावे लागले. कोकणातही अशीच परिस्थिती होती. कोकण पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांनीही त्यांचे बुकिंग रद्द केले केले होते. याशिवाय कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिरातील भाविकांची संख्या कमी झाली. तसेच पन्हाळा गड, ज्योतिबा मंदिर, तिरूपती बालाजी, शिर्डी, शेगाव यांसह अनेक ठिकाणी परिणाम झाला. तर नाशिकमधल्या तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या रोडावली.

जगभरातल्या पर्यटन, उद्योग अशा सगळ्याच क्षेत्राचं आर्थिक नुकसान झालं आहे. राज्यातील पर्यटन क्षेत्रालाही याचा फटका बसला आहे. एखादा विदेशी पर्यटक जेव्हा भारतात फिरायला येतो, त्यामुळे देशातल्या ७ जणांना रोजगार मिळतो, यामध्ये हॉटेलपासून ते खाद्यपदार्थांचा स्टॉल्स लावणाऱ्या सगळ्यांचा समावेश होतो, पर्यटन व्यवसायाशी फक्त पर्यटक, हॉटेल, गाडी, गाईड यांनाच रोजगार मिळतो असे नाही, तर इतर अनेक जण पोटापाण्यासाठी या व्यवसायावर अवलंबून असतात. यात केरळमधील बोट चालवणारे, काश्मीरमधील हाऊस बोटीवाले तर डान्स पार्टीत सहभाग नोंदवणारे अनेकांचा सहभाग असतो. या सर्वांना कोरोनामुळे बेरोजगारीशी झुंज द्यावी लागली.

**उत्पादन क्षेत्र**

कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनचा उत्पादन क्षेत्रावर मोठा परिणाम झालेला दिसून येतो. सर्वाधिक रोजगार उपलब्ध

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

करून देणारे क्षेत्र म्हणजे उत्पादन क्षेत्र होय. देशात वस्तू व सेवांचे उत्पादन करणारे लाखो उद्योग आहे. संचारबंदीमुळे अनेक उद्योग बंद अवस्थेत होते. काही उद्योग तर संचारबंदी संपल्यानंतरही सुरू होऊ शकले नाही. ज्या संयोजकांना लॉकडाऊनमुळे उद्योग दिवाळखोरीत निघण्याची भिती होती अशा संयोजकांनी उद्योगच बंद केले. अनेक किरकोळ उत्पादकांनी निर्गुंतवणूक करून भांडवल सुरक्षित ठेवले. त्यामुळे संबंधित उद्योगांवर आधारित कामगारांना व इतर अवलंबितांना बेरोजगार व्हावे लागले. अजुनही अनेक उद्योग सुरू झाले असले तरी कामगारांना महिन्यातून फक्त १५ दिवस काम मिळते. त्यामुळे प्रछन्न व छुपी बेकारी सुध्दा वाढलेली दिसून येते.

**रिक्षाचालक, ट्रॅवल्स व वाहतूक व्यवसाय**

कोरोनामुळे वाहतुक सेवेतील अनेक रिक्षाचालकांसह इतरांचे रोजगार बुडाले. बेरोजगारी आधीच मोठ्याप्रमाणात असताना शहर व ग्रामीण भागातील तरूणांनी कर्ज काढून रिक्षा व्यवसाय सुरू केला. लॉकडाऊनमुळे रिक्षा व्यवसायाचे कंबरडे मोडले. शहरी व ग्रामिण भागातील बेरोजगार तरूण घरच्यांच्या मदतीने, स्थानिक पतसंस्था, बॅंकेकडून, खाजगी फायनान्स कंपनीकडून कर्ज काढून रिक्षा व इतर वाहन घेत आपला उदरनिर्वाह करतात. आधीच या व्यवसायात फार स्पर्धा आहे. त्यात कोरोनाची भर पडल्याने या कुटुंबियांची आर्थिक परवड सुरू झाली. कौटुंबिक जबाबदाऱ्या, दवाखाना व विविध खर्चाने हे व्यावसायिक मेटाकुटीस आले आहेत. लॉकडाऊनमुळे रिक्षा व वाहतूक बंद असल्याने धंदा तर गेलाच. मात्र घेतलेल्या कर्जाचे हप्ते थकल्याने मोठे संकट उभे राहिले होते. बेरोजगारी व वाहन कर्जाचे ओझे या विरूध्द अजूनही वाहतूक क्षेत्रातील कामगार झटत आहे.

**बांधकाम व्यवसाय**

भारतात शेती व्यवसायानंतर सर्वात मोठा कुठला व्यवसाय असेल तर लगेचच रिअल इस्टेटचे नाव समोर येते. कोरोना या महामारीमुळे लॉकडाऊन सुरू झाले आणि अचानक सर्व व्यवहार ठप्प झाले. लोकांच्या नोकरीवर गदा येऊ लागली, पगार कपात झाली. अगोदरचे उंचावलेले जीवनमान आणि राहणीमान यांच्यावर लगेच परिणाम जाणवू लागला. शाळा, कॉलेज बंदमुळे विद्यार्थी गावाला गेले आणि त्यावर आधारीत असलेल्या रिअल इस्टेट व्यवसायाला फटका बसला. नोकऱ्या जात आहेत आणि व्यवसाय मंदावल्यामुळे बांधकाम व्यवसायाला तर मोठा फटका बसला आहे. त्यामुळे त्यावर आधारित असलेले देशातील कोट्यवधी कुशल, अर्धकुशल व अकुशल मजुर बेरोजगार झाले.

कोरोना या संकटामुळे जगातील १.६ अब्ज लोक म्हणजेच, जगभरातील जवळपास अर्धे कामगार बेरोजगार होण्याची शक्यता आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने व्यक्त केली होती. जगभरात सुमारे ३.३ अब्ज कामगार आहेत, असंघटित अर्थव्यवस्थेत जवळपास दोन अब्ज कामगार आहेत आणि अशा कामगारांची नोकरी जाण्याचा सर्वाधिक फटका बसला. कोरोना व्हायरस संकटामुळे बऱ्याच देशांनी कारखाने, शाळा, रेस्टॉरंट्स, सार्वजनिक सेवा आणि रोजगारासाठीचे इतर मार्ग बंद केले आहेत, ज्यामुळे अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसला.

या साथीच्या आजारामुळे आणि नोकरीच्या संकटामुळे कामगारांना उदरनिर्वाह करणे अवघड झाले आहे. लाखो कामगारांची कमाई न होणे म्हणजेच त्यांचे भविष्य संपण्यासारखे आहे. जगभरातील कोट्यवधी व्यवसाय सध्या बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत, कोट्यवधी कामगारांकडे उत्पन्नाचा मार्ग नाही, अन्न, सुरक्षा किंवा भविष्य नाही. त्यांच्याकडे बचत आणि पतपुरवठा करण्याचा पर्यायही नाही. या संकटात ज्या क्षेत्रांना सर्वात जास्त फटका बसला आहे त्यामध्ये, उत्पादन, अन्न सेवा, हॉटेल उद्योग, घाऊक, किरकोळ आणि रिअल इस्टेट या क्षेत्रांचा समावेश आहे.

**निष्कर्ष :**

कोरोना विषाणूच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर झालेल्या विपरीत परिणामांमुळे डगमगून न जाता प्रत्येक छोट्या–मोठ्या उत्पादकांनी, व्यावसायिकांनी, कामगारांनी, शेतकरी व इतर घटकांनी कोरोनासारख्या विषाणूंपासून आपल्याला काहीतरी शिकायला मिळाले हि भावना मनात ठेवावी. भविष्यात येणाऱ्या अशा अनेक संकटांना कशाप्रकारे तोंड देता येईल याची तयारी करूनच व्यवसाय करणे आवश्यक आहे. व्यावसायिकांनी स्वत:च्या अडचणी व परिस्थितीचे विश्लेषण करून उपाययोजना केल्या पाहिजेत. आणि त्यानुसारच कार्य केले पाहिजे. शासनाने उत्पन्न वाढीचे नवे स्त्रोत शोधून समाजातील शेवटच्या घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजे. उत्पादन क्षेत्रातील घटकांनी आशा जिवंत ठेवून पुन्हा नव्याने भरारी घेण्याचा आत्मविश्वास ठेवावा.

सकारात्मक दृष्टीकोन बाळगून परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य प्रयत्न प्रत्येक नागरिकांनी करण्याची गरज आहे. आलेल्या संकटांवर मात करून नवे क्षितीज गाठण्यासाठी प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्रात नवनिर्माण करण्याची व अर्थव्यवस्थेला बळ देण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ :**

http://www.newsindianexeress.com
https://m.economictimes.com
https://hi.m.wikipedia.org
http://www.bbc.com
https://maratha.webdunia.com
Daily Newspaper Lokmat
https://navbharattimes.indiatimes.com